करोना 2020/सूचनां/आदेश क्र. ९८७

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक:- 02141-222118/222097/222001 फॅक्स क्रमांक: 02141-222025/227451
Email: collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/करोनाविषाणू/उदयोग परवानगी/2020 दि. 4/04/2020

वाचले:- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005
2) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,1897
3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, 1897 ची नियमावली दि.14/03/2020 नूसार महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजना नियम,2020.
4) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग दिनांक 25/03/2020.
5) शासन स्पष्टीकरण, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग दिनांक 03/04/2020.

---

**आदेश**

उपोद्घातातील क्र.3 अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांनी कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंध कायदा, 1897 दि.13/03/2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदींनूसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसचूनेच्या नियम,10 नूसार जिल्हाधिकारी रायगड यांना रायगड जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

उपोदघातातील संदर्भ क्र.4 अन्वये महाराष्ट्रामध्ये दिनांक 14/4/2020 च्या मध्यरात्रीपर्यंत लॉक डाऊन घोषीत करण्यात आले होते. त्यामधील **परिच्छेद क्र. 8(अ)** मध्ये नमूद केलेले उदयोग ज्यामध्ये अन्न व त्याच्याशी निगडीत उदयोग, साखर, दूध, जनावरांचे खादय व चारा, औषध निर्माण उदयोग व त्यांचे अधिकृत विक्रते व त्यांची वाहतूक करणारे जसे की, लस, सॅनिटायझर, साबण, पावडर, मास्क, वैद्यकिय उपकरणे व त्याचे भाग आणि त्यांच्या संलग्न सेवा आणि **परिच्छेद क्र.8 (ब)** मध्ये जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या परवानगीने अखंडीत उत्पादन करणारे उदयोग.

1. यांच्याबाबत उपोदघातातील अ.क्र.5 अन्वये वरील **8(अ) व 8(ब)** मधील नमूद उदयोगांना कोणत्याही परवानगीची गरज लागणार नाही. हे उदयोग पुन्हा सूरू करणे किंवा उत्पादन चालू ठेवण्यासाठी लेखी अथवा ईलेक्ट्रॉनिक परवानगीची गरज नाही. वेअरहाऊस, स्टॉकिस्ट, घाऊक व किरकोळ विक्रेते यांना वस्तुंच्या वाहतूकीसाठी भारत सरकारने

परवानगी दिली आहे. वाहतूकीसाठी स्वयंघोषणापत्र वाहनावर चिकटवणे पुरेसे आहे. वरील उदयोगांनी अंतर्गत निर्जतुकीकरण, सुरक्षीत सामाजिक अंतर व आरोग्य विषयक बाबींची काळजी घेवून कमीत कमी कर्मचाऱ्यांसह उदयोग सूरू ठेवण्याचे आहेत.

2. वरील परिच्छेद 8(अ) मध्ये नमूद उदयोगांना पॅकेजिंग पुरविणाऱ्या सर्व उदयोगांनाही त्यांचे उदयोग चालू ठेवण्यासाठी परवानगी या आदेशांन्वये देण्यात येत आहे.

3. त्याचबरोबर वरील सर्व उदयोगांना कच्चा माल पुरविणाऱ्या कंपन्यांनाही त्यांचे उदयोग चालू ठेवण्याची परवानगी या आदेशांन्वये देण्यात येत आहे. त्याचबरोबर कच्चा माल पुरविण्यात येणाऱ्या कंपन्यांची यादी ही संबंधीत उत्पादकाकडे उपोदघातातील संदर्भ क्र.5 कडील अधिसूचनेपूर्वीची असावी. कच्चा माल पुरवठादारांनी अटीचा भंग केल्यास त्याचा परवाना रदद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.03/04/2020 रोजी माझे सहि व शिक्क्यानिशी दिला असे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

**प्रत** :

1. मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांस माहितीस्तव सादर.
2. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांस माहितीस्तव.
3. पोलीस अधिक्षक, रायगड यांस माहितीस्तव.
4. पोलीस उपआयुक्त, झोन-2 पनवेल यांस माहितीस्तव.
5. उपविभागीय अधिकारी- सर्व.
6. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल/पेण.
7. सह संचालक, औदयोगिक सुरक्षा व आरोग्य पनवेल.
8. प्रादेशिक अधिकारी महापे/पनवेल.
9. तहसिलदार -सर्व.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग